# Minute 1

अण्णासाहेब मगर महाविद्यालय माजी विद्यार्थी संघ
रजि. नं. महा/१०७३/२०१६/पुणे
जुलै-१६

CLASSMATE
Date :
Page :

दि. 12 मार्च 2021

बुधवार दि. 10 मार्च 2021 रोजी अण्णासाहेब मगर महाविद्यालयाच्या सभागृहात माजी विद्यार्थी संघटनेच्या कार्यकारी मंडळाची बैठक संपन्न झाली. या सभेच्या अध्यक्षस्थानी संघटनेचे अध्यक्ष मा. सुरेश घुले होते. या बैठकीत खालील विषयांवर चर्चा झाली.

1) माजी विद्यार्थी संघाचे सचिव प्रा. नितीन लगड यांनी मागिल वर्षीचा वृत्तांत वाचून दाखविला. या वृत्तांताला सर्व उपस्थित कार्यकारिणी सदस्यांनी एकमुखाने मान्यता दिली.

2) संघटनेचे अध्यक्ष मा. सुरेश घुले यांनी कोरोना आपत्ती निवारण निधी म्हणून महाराष्ट्र मुख्यमंत्री निधीला संघाच्या वतीने 10,000/- रु. मदत केल्याचे सांगितले. संघटनेचे उपाध्यक्ष मा. प्राचार्य एम. आर. वाल्हेर यांनी सदर बाबीचे कौतुक केले.

3) मा. शोभा पाटील यांनी संघटनेची सदस्यसंख्या वाढीसाठी विविध उपाय सुचविले. श्री. कृष्णकांत कोबल यांनी देखील विविध बाबींवर यासंदर्भात चर्चा केली.

4) मागिल वर्षात कोरोना प्रादुर्भावाच्या प्रत्यक्षरित्या बाधित विद्यार्थ्यांना आर्थिक मदत संघाच्या वतीने केली गेली. त्यासंबंधीची माहिती खजिनदार श्री. सुनील बनकर यांनी दिली. अत्यंत खेळीमेळीच्या वातावरणात सभा संपन्न झाली.

* सभेस उपस्थित कार्यकारिणी सदस्यांची नावे — सही.

1) मा. श्री. सुरेश घुले — [signature]
2) मा. श्री. एम. आर. वाल्हेर — [signature]
3) मा. श्री. सुनील बनकर — [signature]
4) मा. श्री. नितीन लगड — [signature]
5) मा. श्री. कृष्णकांत कोबल — [signature]

6) मा. प्रशांत सुरसे - प्रशांत

7) डॉ. शोभा पाटील - डॉ. शोभापाटील

8) डॉ. सुनिता डाखले -

9) श्री. शिरीश तळेकरी -

महाविद्यालय माजी विद्यार्थी संघ ★ पुणे-४११०२८.
रजि. नं.
महा/९००७३/
२०१६/पुणे
जुलै-१६

Minute 2

महाविद्यालय माजी विद्यार्थी संघ ★ रजि. नं. महा/१००३/२०१६/पुणे जुलै-१६ ★ इंदापूर, पुणे-४१३१०६



दि. ३० एप्रिल २०२१

बुधवार दि. २८ एप्रिल २०२१ रोजी महाविद्यालयात माजी विद्यार्थी संघटनेची बैठक संपन्न झाली. या बैठकीच्या अध्यक्षस्थानी श्री सुरेश घुले होते. या बैठकीत खालील चर्चा झाली.

१) या सभेत प्रथमत: कार्यकारिणीचे सदस्य मा. चंद्रकांत मगर यांना श्रद्धांजली वाहण्यात आली. कोरोनाच्या साथीमुळे त्यांचे निधन झाले. त्यांच्या एकूणच कार्याबद्दल आदर व्यक्त करणारी मनोगते सर्वांनी व्यक्त केली.

२) येत्या काळात गरीब विद्यार्थ्यांना जास्तीत-जास्त आर्थिक साहाय्य करण्याचा मानस खजिनदार सुनील बनकर यांनी व्यक्त केला. सर्व सदस्यांनी त्यास पाठींबा दिला.

३) माजी विद्यार्थ्यांना online सदस्य नोंदणी करता यावी, यासाठी online mode वर फार्म भरण्याची संधी उपलब्ध करून देण्यात यावी असा ठराव एकमुखाने संमत झाला.

४) माजी विद्यार्थी संघटनेच्या वतीने अधिकाधिक निधी उभा करण्यासाठी विविध उपायांची चर्चा बैठकीत करण्यात आली. संघटनेचे अध्यक्ष श्री. सुरेश घुले यांनी यासंबंधी अधिक पुढाकार घेऊन सर्वांनीच सहाय्य करावे असे सुचविले.

५) एकंदरीतच अत्यंत सौहार्दपूर्ण अशी बैठक संपन्न झाली.

६) लवकरच येत्या काळात माजी विद्यार्थी संघाचा मेळावा घेण्याचे निश्चित करण्यात आले.

एकूणच महाविद्यालयाच्या सर्वांगीण प्रगतीसाठी सर्वांनी सत्कार्य करावे, अशी भूमिका सर्वांनीच मांडली.

१) मा. श्री. सुरेश घुले - [signature]
२) मा. श्री. महादेव वाल्हेर - [signature]
३) मा. श्री. सुनील बनकर - [signature]
४) मा. श्री. नितीन लगड - [signature]
५) मा. श्री. कृष्णकांत कोबल - [signature]

6) डॉ. शोभा पाटील —
7) डॉ. सुनीता डाखले —
8) श्री. प्रशांत तुरसे —
9) श्री. शिरीश लळकेरी —

अण्णासाहेब मगर महाविद्यालय माजी विद्यार्थी संघ
रजि. नं.
महा/१०७३/
२०१६/पुणे
जुलै-१६
पुणे-४११०२८